नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २५/०६/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

### गैरकायदयाची मंडळी

**पो.स्टे. कळमेश्वर**:— अंतर्गत २२ कि.मी अंतरावरील मौजा चाकडोह ते पारडी (देशमुख) रस्त्यावरील सरकारी जमिनीवर सर्वहे क्रमांक ७२ येथे दिनांक २४/०६/२०२२ चे १२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— आयुषलाल रामस्वरूप राजपूत, वय ३५ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. चाकडोह ते पारडी (देशमुख) रस्त्यावरील सरकारी जमिनीवर हे त्यांच्या घरी हजर असतांना आरोपी क्र. १) प्रकाश लक्ष्मण भागवत, २) भालचंद्र राऊत, ३) भालचंद्र उत्तम राऊत, वय ३७ वर्ष रा पारडी देशमूख, ४) शुभम अशोक कोहडे, वय २६ वर्ष रा. शिवनगाव सीआरपी गेट नागपूर व ४) सुरज गणपतराव भूरे वय २७ वर्ष, रा. आदर्श कॉलोनी प्लॅट १ कळमेश्वर यांनी संगणमत करून फिर्यादी व त्यांच्या समाजातील लोकांनी चाकडोह ते पारडी (देशमुख) रस्त्यावरील सरकारी जमिनीवर बांधलेल्या झोपड्यांची जागा ही त्यांची असल्याचे सांगून, तसेच आरोपी प्रकाश भागवत याच्या शेतात पेरणी का केली या कारणावरून त्यांच्या सामानाची मोडतोड केली. त्यावेळी फिर्यादींची वहिनी नामे राजवंती त्यांना तोडफोड करू नका असे सांगण्यास गेली असता प्रकाश लक्ष्मण भागवत याने तिच्या व मोहनदास चव्हाण यांच्या डोक्यावर काठीने मारहाण करून त्यांना जखमी केले. तसेच फिर्यादी व समाजाच्या ०६ झोपड्या जाळून संसारोपयोगी साहित्य, कागदपत्रांचे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३,१४७,१४९,३२४,४३६ भारतीय दंड विधान सहकलम ३ (२), (५ अ), सहकलम ३ (अ), (झेड) अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अजय चांदखेडे हे करीत आहे.

### फसवणुक

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा माहुली येथे दिनांक १८/१०/२०१२ चे ११.०० वा. ते दिनांक २०/०५/२०२२ चे १३.०० वा. दरम्यान आरोपी क्र. १) सचीन सुखदेव मेश्राम वय ४५ वर्ष व २) अश्विनी सचीन मेश्राम वय ४२ वर्ष दोन्ही रा. मंगलनगर पारशिवनी व ३) विजय पंडलीक देउळकर वय ४२ वर्ष रा. वैशाली बाजारच्या समोर रामटेक रोड पारशिवनी यांनी त्यांची संबोधी ग्रामीण बिगर शेती सं. पंतसंस्था मर्या. पारशिवनी आहे असे म्हणुन फिर्यादी नामे— आशाबाई राजेंद्र उंबरकर वय ५२ वर्ष रा. माहुली यांच्या कडुन एकुण १,२५,०००/—रू. घेवुन ते पाच वर्षात डबल करून देवु असे खोटे आश्वासन देवुन फिर्यादी चा विश्वासघात करून फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ४०६, ४०९, ४१८, ४२०, ४६५, ४६७, ४६८, १२० (ब) ५०६ भादवी सहकलम १४६ (e-1), १४७ (e-1) महाराष्ट्र सहकारी संस्था अधीनियम १९६० सहकलम ३ महाराष्ट्र ठेवीदाराच्या हिताचे संरक्षण कायदा १९९९ अन्वये

गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री पळनाटे मो.क्र. ७३८७०८६१७८ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. काटोल :— फिर्यादीचे भाउ नामे— मंगेश पंजाबराव कौरती(मृतक), वय २८ वर्ष रा. खानगाव काटोल याला टी.बी. चा आजार असुन दिनांक २४/०६/२०२२ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादीचा मुलगा त्यांना (मृतक) जेवणाकरिता उठविण्यास गेला असता फिर्यादीचे मुलाने सांगितले की, 'मामा कोणत्याही प्रकारची हालचाल करीत नाही' असे फिर्यादी नामे— श्रीमती सुरेखा सुभाष कौरती वय ३२ वर्ष रा. खानगाव ता. काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास मपोहवा पंचफुला मोरे मो.नं. ९०४९९३९५०० या करीत आहे.

२) पो.स्टे. जलालखेडा :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा जलालखेडा (ग्रामपंचायत विहीर) येथे दिनांक दिनांक २३/०६/२०२२ ते २४/०६/२०२२ चे ११.०० वा. दरम्यान **मंगेश गोवीन्दराव नाडेकर (मृतक), वय २६ वर्ष, रा. जलालखेडा वार्ड क्र. ३, ता.नरखेड जि. नागपुर** याची पत्नी गेल्या दोन महिनेपासुन त्याला सोडून घरुन निघून गेली. तेव्हापासुन तो टेंशनमध्ये राहात होता त्याचे मानसिक संतुलन बीघडल्याने तो नेहमी विचारात राहात होता. त्याच कारणामुळे त्याने ग्रामपंचायत जलालखेडा विहीरीत उडी घेवून मृत अवस्थेत आढळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— भागवत शामराव कनीरे, वय ५० वर्ष, रा. मेंठला त. नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार रिधोरकर मो.न. ८००७६७१९८६हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर